**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)**
**गणेशखिंड, पुणे**

**Media Co-ordination Cell**
Ganeshkhind, Pune-7

६ डिसेंबर २०१८

# विद्यापीठात आपत्कालीन वैद्यकीय सेवांचे शनिवारी केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते उदघाटन

पुणे -

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी अशा सर्वांसाठी आपत्कालिन वैद्यकीय सेवा तसेच, दंतचिकित्सा सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्याचे उद्घाटन केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) श्री. श्रीपाद नाईक यांच्या हस्ते येत्या शनिवारी (८ डिसेंबर २०१८) दुपारी ३.४५ वाजता होणार आहे.

या कार्यक्रमाला कुलगुरू प्रो. (डॉ.) नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य श्री. राजेश पांडे, डॉ. सोमनाथ पाटील उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती विद्यापीठातील आरोग्य केंद्राचे समन्वयक डॉ. शशिकांत दुधगावकर यांनी दिली.

विद्यापीठातील आरोग्य केंद्रात सध्या सकाळी व सायंकाळी बाह्य रुग्ण विभाग (ओपीडी), नियमित औषधे, सुसज्ज लॅबोरेटरी, डिजिटल एक्स-रे तसेच, मानद तज्ज्ञांद्वारे सल्ला, फिजिओथेरपी अशा सेवा पुरवल्या जातात. नव्या सुविधांमध्ये आपत्कालीन वेळी वैद्यकीय प्रथमोपचार देणे, अत्यवस्थ रुग्णाला तातडीचे उपचार देऊन त्याची प्रकृती स्थिर करणे, त्याला नजिकच्या रुग्णालयात हलवणे या सुविधा दिल्या जाणार आहेत. त्यासाठी सुसज्ज रुग्णवाहिकाही उपलब्ध करून दिली जाणार आहे. याचबरोबर विद्यापीठाच्या कामकाजाच्या दिवशी दंतचिकित्सा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
sppumediacell@gmail.com